
Prof. Dr. Shriniwas Hemade, madshri@otmail.com, 09226563052, ttp://shriniwashemade.yolasite.com/



### अभ्यासक्रम



1. ईश्वराचे स्वरूप आणि गुणधर्म
2. ईश्वर आणि जग यांचा संबंध :
   देववाद, ईश्वरवाद, सर्वेश्वरवाद
3. ईश्वराच्या अस्तित्वाचे युक्तिवाद
   (भारतीय आणि पाश्चात्य )

# Unit 8

# GOD

# घटक ८

# ईश्वरमीमांसा

प्रस्तावना :

## ईश्वराची संकल्पना

तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतांना 'ईश्वर चिंतन' आणि 'ईश्वराच्या संकल्पने ' ची चिकित्सा अनिवार्य ठरते. 'ईश्वर' ही प्रत्येक धर्मातील आधारभूत संकल्पना आहे. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाने किंवा विद्यार्थ्याने खासगी जीवनात ईश्वर मानला आहे की नाही, या भूमिकेशी हे चिंतन संबंधित नाही. अभ्यासाचा आणि सांस्कृतिक जीवनाचा अपरिहार्य घटक म्हणून 'ईश्वर चिंतन' आणि 'ईश्वराच्या संकल्पने ' ची चिकित्सा आवश्यक असते. कारण ईश्वर ही संकल्पना करण्याच्या वैचारिक प्रक्रियेचा अंतिम टप्पा मानता येतो.

'धर्म' किंवा धर्मसंस्था' जेंव्हा ईश्वराचे चिंतन करतात, तेंव्हा ईश्वरविषयक दोन भूमिका पुढे येतात. एकतर ***अनिवार्य नियंत्रक सत्ता*** म्हणून ईश्वराचे अस्तित्व स्वीकारले जाते किंवा  नाकारले जाते. त्यामुळे धर्माचे दोन प्रकार पडतात.

1. **ईश्वरवादी धर्म**
2. **निरीश्वरवादी धर्म**

निरीश्वरवादी प्रथम केवळ एक श्रद्धा म्हणून ईश्वराचे अस्तित्व स्वीकारतात. आणि नंतर त्याच्या अस्तित्वासाठी पुरावे देऊ पाहतात.निरीश्वरवादी धर्म ईश्वराच्या अस्तित्वाला तीव्र आव्हान देतात आणि नाकारतात. उदा. बौदध धर्म आणि जैन दर्शन ईश्वर संकल्पना तत्वज्ञानाच्या धर्माच्या पातळीवर पूर्णपणे नाकारतात. खिश्चन, इस्लाम, यहुदी इत्यादी धर्म ईश्वराचे अस्तित्व स्वीकारतो. हिंदुचे तत्वज्ञान किंवा दर्शनही ईश्वराची समस्या फारश्या गंभीरपणे होत नाही. खरेतर सर्वच दर्शनी ईश्वर नाकारतो आणि दिलेच तर दुय्यम स्थान देतात. चार्वाक तत्त्वज्ञान तर ईश्वरांचा पूर्णपणे धिक्कार करतो. धर्मही नाकारतो. पण ईश्वर संकल्पनेची चिकित्सा केल्याशिवाय चिंतन पूर्ण होऊ शकत नाही. ईश्वर नाही असे म्हणणारी व्यक्ती अथवा धर्म ईश्वर स्वीकृतीमुळे निर्माण होणा-या कर्मकांडाला नकार देत असते, असा काही जणांचा दावा आहे. पण तो दावा निरीश्वरवादावर अप्रत्यक्षात का होईना ईश्वर लादण्यासाठी ईश्वरवादी करीत असतात. पण ही बौद्धिक मखलाशी असते. कारण ईश्वरांचे चिंतन करणे याचा अर्थ ईश्वर अनिवार्य स्वीकारणे असा होत नाही. ईश्वरांचे चिंतन करणे म्हणजे ईश्वर स्वीकृतीचे तर्कशास्त्र नसते.

ईश्वर स्वीकारावा की नाही ?  धर्मचिंतनात तो अनिवार्य आहे का ? एवढीच 'ईश्वर चिंतना' ची मर्यादा असते. बौद्ध धर्म ईश्वर चिंतन ही अनिवार्य समजत नाही. ग्रीक अणुवादी आणि चार्वाक , हे दोघेही ईश्वरच काय धर्मही फेटाळतात. तरीही ईश्वर विषयक समस्या चिंतन क्षेत्रात अपरिहार्यपणे येते. हे खरे स्वतःच्या कमतरता, मर्यादा आणि मुख्य म्हणजे मृत्युसारखी संपूर्णपणे अज्ञात आणि नियंत्रणाबाहेरची घटना माणसाला दुर्बल बनवते. हे ईश्वर चिंतनामागील एक कारण असले तरीही ज्ञानाचा विषय म्हणून 'ईश्वर' नाकारता येत नसतो. ही संकल्पना

ज्यांना सुचते ते गंभीरपणे विचार करतात. त्यामागे त्यांचा चिंतनाचा हेतू नैतिक व प्रामाणिक असतो. 'मानवाचे कल्याण' ही त्यांची प्रेरणा असते. ईश्वर असो वा नसो; अशी चिंतन करणारी माणसे होत गेली हे तरी निश्चित आहे ना ?! अशा सुहृद माणसांच्या मानव कल्याणाच्या सद्हेतूपुढे आणि त्याच्या बुद्धिवैभवापुढे आपण नतमस्तक झाले पाहिजे. यात निरीश्वरवादयाला सुद्धा अडचण येऊ नये.



1. **ईश्वराचे स्वरूप आणि गुणधर्म**

**ईश्वर संज्ञेचा अर्थ :-**

***'ईश्'*** म्हणजे स्वामित्व, नियंत्रण किंवा सत्ता चालवणे आणि ***'अश्'*** म्हणजे व्यापून रहाणे. अशा धातूपासून ***ईश्वर*** शब्द बनतो. म्हणून सर्वत्र व्यापून असणारी विश्वातील स्वामित्व शक्ती किंवा सर्वत्र असणारी सत्ता' म्हणजे ***ईश्वर*** होय. ''अखिल विश्वाचा कर्ता, नियंता, सर्वव्यापी अंर्तयामी अशी परम सत्ता म्हणजे ईश्वर '' असा अर्थ यात दिसतो.

ईश्वर संज्ञेच्या अर्थात काही प्रमाणात ईश्वर संकल्पना आढळते. नियंत्रण करणारी सर्वोच्च शक्ती अशी ती म्हणता येईल. या संकल्पनेचा विकास म्हणून सर्वज्ञ, सर्वव्यापी, दयाळू इ. गुणांचे आरोपण संकल्पनेत झाले. ही अर्थातच एक मानव निर्मित संकल्पना आहे. साहजिकच ती मानवापूरतीच मर्यादीत राहते. विविध धर्म संप्रदायानुसार ही संकल्पना स्वरुपात थोडी फार बदलते पण ***सर्वोच्च नियंत्रक शक्ती*** हा तिचा आशय स्थिर राहतो.

**ईश्वराचे स्वरुप**

सगुण साकार किंवा निर्गुण निराकार हे ईश्वराचे रुप किंवा स्वरुप धर्म तत्वज्ञानाने स्वीकारलेले आहे. निर्गुण निराकार ईश्वर तत्वचिंतकांनी आणि संतांनी स्वीकारला. सर्वसामान्य जनांसाठी त्याच निर्गुण निराकार ईश्वराला त्याने सगुण साकाराचे रुप दिले. आणि त्यातून प्रत्येक धर्माप्रमाणे वेगवेगळा ईश्वर अस्तित्वात आला तशी कल्पना आली. अशा ईश्वराला भजण्यासाठी प्रत्येक धर्माने धार्मिक जीवनपदधती सांगितली. धार्मिक श्रदधा, विचार, आचार, धर्म संस्था, प्रत्येक धर्मानुसार वेगवेगळया असल्या तरी ईश्वर स्वरुपाविषयीच्या दृष्टीकोन सर्वत्र समानच आढळतो. ईश्वर स्वरुपाची ही संकल्पना सर्व साधारणपणे सर्वमान्य झालेली आहे. त्याविषयीच्या फारशी चिकित्सा केली जात नाही.

नामरुपात्मक विश्वाची उत्पत्ती, स्थिती, आणि लय यांचे कारण असणारा हा ईश्वर होय. असा ईश्वर बहुतेक सर्व धर्म संप्रदायांनी मान्य केलेला आहे. मात्र बौद्ध आणि जैन धर्मानी देव नाकारला. हिंदु तत्वज्ञानातील चार्वाक तत्वज्ञानाने आणि ग्रीक तत्वज्ञांनी ईश्वराचे अस्तित्व पूर्णपणे नाकारले. त्यामुळे ईश्वर कल्पना सर्व धर्माचे गृहीत तत्वज्ञान आहे असे म्हणता येणार नाही. इस्लाम, झरथुष्टी, यहुदी या धर्मात सुद्धा असा तत्वज्ञानात्मक ईश्वर स्वीकारलेला नाही. ज्या धर्मानी ईश्वर संकल्पना स्वीकारली त्यानी सुद्धा हा ईश्वर तीन प्रकारचा स्वीकारला.

1. **निर्गुण**
2. **सगुण**
3. **निर्गुण – सगुण**

ईश्वर निर्गुण असेल तर तो आकारहीन असतो. आणि सगुण असेल तर आकारयुक्त पाहिजे. हे गृहित धरुन ईश्वर कल्पना तीन प्रकारची झाली.

1. **निर्गुण निराकार**
2. **सगुण निराकार**
3. **सगुण साकार**

उपनिषदांमधील ब्रह्म, जपानी बौदध धर्मातील 'ताओ' ही संकल्पना र्निगुण निराकारांची आहे गॉड आणि अल्लाह् ही सगुण निराकाराची आहे. तर प्राचीन ग्रीक आणि हिंदु तत्वज्ञानातील [खरे म्हणजे धर्मातील] संकल्पना सगुण साकाराची आहे.

## ईश्वराचे गुणधर्म

धर्माचे तत्वज्ञान ईश्वराच्या स्वरुपाविषयी चिकित्सक दृष्टीकोन स्वीकारते आणि ईश्वराचे विविध गुणधर्म किंवा गुण स्पष्ट करते. वेगवेगळया धर्मसंस्था आणि धर्म संप्रदायांमधील ईश्वराचे स्वरुप लक्षात घेऊन धर्माचे तत्वज्ञान ईश्वराचे गुण निश्चित करते. 'Philosophy of Religion'या ग्रंथात गॅलोवे या अभ्यासकाने हे विविध दृष्टीकोन स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे.



- ईश्वराचे सत्ताशास्त्रीय गुण (Metaphysical Atributes)
- ईश्वराचे नैतिक गुण (Moral Attributes of God)
- विश्वशास्त्रीय गुण (Cosmological Attributes of God)
- समाजशास्त्रीय गुण (Socialogical Attributes of God)
- साक्षात्कार शास्त्रीय गुण (Mystical Attributes of God)

- **ईश्वराचे सत्ताशास्त्रीय गुण (Metaphysical Atributes)**
  1. सर्वशक्तीमानता (omnipotensc)
  2. सर्वज्ञता (omniscience)
  3. सर्वव्यापकता (omnipresence)

- **ईश्वराचे नैतिक गुण (Moral Attributes of God)**
  1. कल्याणकारी (Good)
  2. न्यायी (Just)
  3. शिव (Holy)

- **विश्वशास्त्रीय गुण (Cosmological Attributes of God)**
  1. विश्वनिर्माता (Creator)
  2. विश्वातीत (Transcendent)
  3. विश्वांतर्यामी (Immanent)
  4. अनंत (Infinete)
  5. सनातन (Eternal)
  6. केवल (Absolute)

ईश्वराच्या या विश्वशास्त्रीय गुणांआधारेच ईश्वरवाद सर्वेश्वरवाद विश्वांतर्यामी ईश्वर अशा भूमिका निर्माण झालेल्या आहेत. हाच ईश्वर सर्वांना भावणारा आहे.

- **समाजशास्त्रीय गुण (Socialogical Attributes of God)**

विश्वनिर्माण केल्यानंतर निर्मितीचा भाग म्हणून समाज अस्तित्वात येते. समाजातील नैतिक मूल्यव्यवस्था जेव्हा ढासाळू लागते दुरिते वाढू लागतात तेव्हा ईश्वर अवतार होतो. किंवा प्रषिताला पाठवतो. पैगंबर, येशू, मोझेस, कृष्ण, राम इ. ईश्वर समाजातील नैतिक अनुशासन नियंत्रणात ठेवतो. आणि समाजाचे कल्याण करतो. अशी कल्पना त्याच्या समाज शास्त्रीय जीवनामध्ये अपेक्षित असतात.

- **साक्षात्कार शास्त्रीय गुण (Mystical Attributes of God)**

अवतार घेणारा ईश्वर हा नैतिक ईश्वर होय. तो सगुण साकार असतो. भक्तांना तो पावतो. अशा ईश्वराची प्राप्ती हे मानवाचे ध्येय असले पाहिजे साकात्कारातून किंवा आत्मा किंवा ईश्वरानुत्पत्तीतून हा ईश्वर प्राप्त होतो. साक्षात्कारी संत पुरुष अशा ईश्वराचे वर्णन केले आहे. त्यातून ईश्वराचे जे गुणविशेष प्रकट होतात. त्यांना साक्षात्कारीय शास्त्रीय गुण म्हणतात. उदा सुंदर ते ध्यान ....... सूर्यकोटी समप्रभ ........

### 2. ईश्वर आणि जग यांचा संबंध : देववाद, ईश्वरवाद, सर्वेश्वरवाद

ईश्वर संकल्पनेचे महत्व मानवी जीवनात अनन्य साधारण आहे. ईश्वरवादी ईश्वराचे अस्तित्व मानून जगतो. तर निरीश्वर वादयाला सुदधा ईश्वर नाही हे सिदध करण्यासाठी का होईना ईश्वराचा विचार करावा लागतो. ईश्वर विषयक समस्या अत्यंत गंभीर आहे. ती अर्थातच मानवालाच भेडसावणारी आहे. ईश्वराचा संबंध ईश्वर विश्व आणि मानव अशा त्रयीतून येतो. मानव विश्वाच्या संदर्भात अस्तित्वात आहे. निर्माता म्हणून ईश्वर विश्वासह मानव निर्माण करतो, असे लक्षात येते. केवळ मानव निर्माण केला आणि विश्व निर्माण केले नाही; असे घडू शकत नाही. विश्वातील अपरिहार्य घटक म्हणून किंबहुना स्वतःचेच प्रतीरुप म्हणून ईश्वर मानवाला निर्माण करतो, अशी ईश्वरवादी मानवाची श्रदधा असते.

या ईश्वर संकल्पनेचा विकास तीन टप्प्यातून झाला.

1. **एकेश्वरवाद** (Deism)
2. **अनेकश्वरवाद** (Theism)
3. **सर्वेश्वरवाद** (Pan-theism)

- **एकेश्वरवाद**

सर्वत्र एकच ईश्वर आहे असे सांगणारा वाद. धर्म श्रदधा स्थापन करण्यासाठी विश्वात एकच ईश्वर आहे असे समर्थन धर्म संस्थापकांनी दिले उदा. ख्रिश्चन, इस्लाम इत्यादी एकेश्वरवादाचा उदय अनेकश्वर वादातून झाला. अनेक ईश्वर स्वीकारल्याने होणारा संघर्ष टाळण्यासाठी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला गेला.

- **अनेकेश्वरवाद**

मानवी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत आदीमानवाने अनेक निसर्ग शक्तीना देवता मानल्यामुळे अनेकश्वरवाद आला. त्यात पितृदेवता, कुलदेवता, ग्राम देवता यांची यांची भर पडली. अनेक देवता वादामुळे धर्मयुदधे झाली. ती टाळण्यासाठी किंवा समन्वयासाठी एकेश्वरवाद आला.

- **सर्वेश्वरवाद**

Pan = सर्व किंवा संपूर्ण. आणि theos = ईश्वर. Theism = ईश्वरवाद. Pan-Theism म्हणजे ईश्वर व विश्व यामध्ये कसलाही भेद नाही, असे मानणारा वाद. Pan-Theism हा शब्द जॉन टोलँड [1] याने १७०५ मध्ये बनविली. ग्रीक, पाश्चात्य व चीनी तसेच भारतीय तत्त्वज्ञानात हा वाद आढळतो. सर्वेश्वरवाद म्हणजे ईश्वर आहे. पण नियंत्रक शक्ती म्हणून विश्वाबाहेर कोठे राहणारा नाही तर तो या विश्वातच आहे. किंबहुना हे विश्व ईश्वराचे शरीर आहे. म्हणजे ईश्वरच विश्व रुपाने साकारला आहे. ही ईश्वराची सगुण साकारवादी कल्पना. र्निगुण निराकार ब्रहम ही र्निगुण निराकार संकल्पना होय. सर्वेश्वरवाद ईश्वर आणि जग एकच आहे असे सांगते.

ईश्वराचे सत्ताशास्त्रीय आणि विश्वशास्त्रीय गुण लक्षात घेता ईश्वर आणि विश्व हा संबंध स्पष्ट होतो. विश्वाची निर्मिती आदी कारण म्हणून ईश्वर स्वीकारला गेला आहे. या विश्वाचे व एकंदरीत मानवी जीवनाचे प्रयोजन, विश्व व्यवस्थेतील नियमबदधता अचूकता, कार्यकारणभाव आणि अपरिहार्यता तसेच विकास या सर्वाचे कारण ईश्वरच आहे. थोडक्यात, ईश्वरी संकल्पने सृष्टी निर्माण होते. आणि ती पूर्णत्वाकडे कमीत होते. असा

---

[1] **John Toland** (30 November 1670 – 11 March 1722) a rationalist philosopher and freethinker, and occasional satirist, wrote numerous books and pamphlets on political philosophy and philosophy of religion. Born in Ireland, and educated at the universities of Glasgow, Edinburgh, Leiden and Oxford and was influenced by the philosophy of John Locke.

दृष्टीकोन स्वीकारण्यात आलेला आहे. हा दृष्टीकोन जगातील सर्व तत्व चिंतनामध्ये मान्य केलेला आहे. त्यातूनच विश्वनिर्मितीवाद प्रचारात आला.

भारतीय तत्वचिंतनात चार्वाकाने ईश्वर किंवा कर्मसिदंधात स्वीकारलेला नाही. त्याऐवजी त्याने स्वभाववाद स्वीकारला सर्व तत्वज्ञानात अद्वैत वेदांताने मात्र र्निगुण निराकार अद्वैत संकल्पना मान्य करुन तिला सगुण साकार ईश्वराचे रुप दिले. हा ईश्वर मायानामक भ्रामक शक्तीच्या साहाय्याने विश्वाची निर्मिती करतो. असे प्रतिपादन केले पण या मायारुपी जगातील जीव किंवा मानव मात्र ईश्वर किंवा ब्रम्ह असल्याचाही आग्रह त्यांनी धरला. बौदध, जैन या धर्मानी ईश्वर नाकारला. पण ईश्वर नियंत्रक तत्व म्हणून कर्म स्वीकारले.



पाश्चात्य तत्वज्ञानात ईश्वर विश्व व मानव यांचा विचार प्रथम ग्रीक चिंतकांनी केला. ग्रीकांमध्ये ईश्वरवादी आणि निरीश्वरवादी विचारवंत होते. निरीश्वरवादयांनी ईश्वराच्या जागी कार्यकारणी तत्व किंवा पृथ्वी आपतेज वायु किंवा अणु किंवा वैश्विक मन अशा संकल्पना स्वीकारल्या. पण या ना त्या स्वरुपात कोणते तरी नियंत्रक तत्व म्हणून मान्य केलेले संक्षेपात विश्व म्हणजे यांत्रिक नियमांनी चालणारा जड प्रकृती चा व्यवहार अशी निरीश्वरवादी भूमिका तसेच विश्व म्हणजे विश्वात्मा ईश्वराचा अविष्कार अशी सर्वेश्ववादी भूमिका ग्रीक पाश्चात्य तत्वज्ञानात आढळते.

### 3. ईश्वराच्या अस्तित्वाचे युक्तिवाद (भारतीय आणि पाश्चात्य )

ईश्वर संकल्पनेचे महत्व पाहता आपण असे म्हटले की ईश्वर ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी सर्वांना विचार करावा लागतो. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीचा विचार तीन दृष्टीकोनातून केला जातो.

1. **ईश्वरवादी**
2. **निरीश्वरवादी**
3. **अज्ञेयवादी**

ईश्वर, ईश्वराचे अस्तित्व मानवी बुदधी पलीकडे आहे ,असे मानणारे व म्हणून ईश्वर हा विषय अज्ञेय आहे असे मानणारे ईश्वरवादयांपैकी काहीजण ईश्वर श्रदधेने स्वीकारतात. तर काही जणांमध्ये प्रज्ञेने ईश्वर जाणला जातो, असे मानतात. उदाहरणार्थ, - वेद, बायबल, कुराण यांनी र्निविवादपणे ईश्वर स्वीकारला. तर काही जणांनी तो तर्कानी स्वीकारला.

निरीश्वरवादी कोणत्याही अर्थाने ईश्वर स्वीकारत नाहीत.

अज्ञेयवादी ईश्वर स्वरुपाविषयी शंका घेऊन ईश्वरवादंयाना ईश्वर अस्तित्वात कसा काय आहे यावरुन छळत असतात. जे ईश्वर स्वीकारतात ते ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी युक्तिवाद ही देतात. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी पाश्चात्य विचारवंतांनी दिलेले मुख्यतः पाच युक्तिवाद आहेत. तथापि ते पाहण्याआधी आपण सत्ताशास्त्रीय युक्तीवादाचे स्वरुप पाहू.

### ईश्वराच्या अस्तित्वासाठीचे युक्तिवाद / पुरावे (Arguments / Proofs for the Existence of God)

ईश्वर / परमेश्र्वर / देव आहे काय असल्यास कशावरुन हा धर्माच्या तत्वज्ञानातील व धर्मशास्त्रातील अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न जसा ईश्वरावर श्रदधा असलेल्या विचारवंतांनी केलेला आहे तसाच ईश्वर नाही असे म्हणणा-या विचारवंतांनीही केलेला आहे. यापैकी पहिल्या प्रकारच्या म्हणजे अस्तिक विचारवंतांनी केलेल्या / मांडलेल्या युक्तिवादांचा [दिलेल्या पुराव्यांचा] विचार इथे करावयाचा आहे.

परमेश्र्वरांचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न करणारे प्रमुख चार युक्तिवाद आहेत.

1. सत्ताशास्त्रीय युक्तिवाद (Ontological Argument)
2. विश्वकारणवादी युक्तिवाद (Cosmological Argument)
3. प्रयोजनवादी युक्तिवाद (Teleological Argument)
4. नैतिक युक्तिवाद (Moral Argument)

या चार युक्तिवादांचा क्रमशः विचार करुयात :-

1. **सत्ताशास्त्रीय युक्तिवाद :-**

सेंट ॲन्स्लेम यांनी ईश्वराच्या अस्तित्वापेक्षा सत्ताशास्त्रीय युवितवाद मांडला आहे. त्यांच्या मते, ज्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ अशी कोणतीही कल्पना नाही, त्या अत्यंत श्रेष्ठ पूर्ण पुरुषांची कल्पना म्हणजे ईश्वर होय.

ईश्वर कल्पना ही सर्वश्रेष्ठ पूर्णत्वाची कल्पना असल्याने ***अस्तित्व*** हा विचा अविभाज्य असा आवश्यक व अपरिहार्य घटक ठरतो. जे पूर्ण आहे ते नाही असे म्हणणे स्वविसंगत किंवा आत्मविरोधी ठरते. ***अस्तित्व*** हा जर ईश्वराचा गुणधर्म मानला तर तो अस्तित्वात आहे !म्हणून सर्वश्रेष्ठ पूर्ण ईश्वराचे अस्तित्व त्याच्या पूर्णत्वातच अंतर्भूत आहे. थोडक्यात, पूर्ण असलेला ईश्वर हा अस्तित्वात असणारच, असा या युक्तिवादाचा आशय आहे.



देकार्त या तत्वज्ञाने सत्ताशास्त्रीय युक्तिवादाला अधिक चांगले रुप दिले. ते असे : सृष्टीतील प्राणी व पदार्थ जसे अपूर्ण असतात, त्याप्रमाणे परमेश्वर अपूर्ण नसून तो पूर्ण आहे. पूर्णाचा अभाव कल्पिता या ठरविता येत नाही. पूर्णत्व आणि अस्तित्व ही ईश्वर कल्पनेची लक्षणे आहेत. उदा. त्रिकोण ही संज्ञा मान्य केली की त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज दोन काटकोनाइतकी [180] असते. हा त्याचा गुणधर्म आवश्यक व अपरिहार्य म्हणून मान्य करावा लागतो. कारण, तो त्रिकोण या संज्ञेतच अंतर्भूत असतो.

**टीका :-** हा युक्तिवाद आक्षेपार्ह आहे. ''मी आहे'' आणि ''मी काळा आहे'' ही दोन विधाने व्याकरणदृष्टया समान असली तरी अर्थदृष्टया समान नाहीत. पहिल्या विधानात '' मी विषयी काहीही सांगितलेले नाही. म्हणून दुस-या विधानाचा दर्जा पहिल्या विधानाला देता येत नाही. याप्रमाणेच परमेश्वर पूर्ण आहे या विधानातून परमेश्वराविषयी आणखी काही [म्हणजे उदा. तो काळा, उंच, जाड आहे अशी] माहिती मिळत नाही. म्हणजेच सृष्टीतील इतर पदार्थाप्रमाणे किंवा प्राण्यांप्रमाणे तो आहे किवा नाही, असे काहीही म्हणता येत नाही. अर्थात, परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करता येत नाही.

परमेश्वराचे अस्तित्व गृहित धरल्याने सेंट ॲन्स्लेम यांचा उपरोक्त युक्तिवाद सदोष झालेला / राहिलेला आहे. अस्तित्व हे विधेय नाही जसे, हा शर्ट पांढरा आहे. या विधानातील पांढरा या शब्दाने [विधेयाने] शर्टाविषयी माहिती दिलेली आहे तशी देव आहे या विधानातील आहे या शब्दाने देवाहून वेगळा असा एखादा वा कोणताही गुणधर्म सूचित वा स्पष्ट होत नाही.

थोडक्यात, पूर्णत्व या कल्पनेत अस्तित्व गृहित धरल्याने सत्ताशास्त्रीय युक्तिवाद तर्कदोषयुक्त झाला आहे. तथापि, परमेश्वराचे अस्तित्व सिदध करण्यासाठीचा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणून या युक्तिवादाला मान्यता दिली गेली आहे. सृष्टीतील प्राणिपदार्थाप्रमाणे परमेश्वराचा अनुभव येत नसल्याने वा अनुभव आला तरी तो अचूक शब्दात मांडता येत नसल्यामुळे सेंट ॲन्स्लेम यांचा हा युक्तिवाद सदोष राहणे अटळ आहे. पूर्णत्व ही कल्पना शब्दांकित करण्याचा कुणाचाही प्रयत्न यशस्वी झाला नाही, होणार नाही.

**2. विश्वकारणवादी युक्तिवाद :-**

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा एक जोरकस प्रयत्न म्हणून महत्वाचा ठरलेला युक्तिवाद म्हणजे सेंट थॉमस ॲक्वायनस यांनी दिलेला विश्वकारणवादी युक्तिवाद होय. या युक्तिवादाची पुढील चार रुपे आहेत.

1. विश्वात गती आहे. पदार्थांना गती देणारा पण स्वतः स्थिर असणारा असा कोणीतरी किंवा असे काहीतरी असले पाहिजे. तो किंवा ती किंवा ते म्हणजेच परमेश्वर होय. या अर्थाने, परमेश्वराला किंवा स्थिर चालक **(Unmoved Mover)** असे म्हटले जाते्

2. विश्वातील विविध घटनांमध्ये काग्रकारणसंबंध आहे. अगोदर कारण असते व नंतर कार्य घडते. प्रत्येक गोष्टीचे कारण शोधत मागे मागे गेल्यास कारणरहित कारणाला (Uncaused Cause) मान्यता दयावी लागते. अर्थात, परमेश्वर हा विश्वाचे मूळ (आदय) कारण होय.
3. विश्वातील काही वस्तू अल्पकाळ टिकणा-या तर काही प्रदीर्घ काळ टिकणा-या असतात. उदा.अन्न व पृथ्वी. परंतू सदासर्वदा असणारी / असणारा कुणीतरी शक्ती किंवा शक्तीमान या आखिल विश्वाची / विश्वाचा साक्षी असली/असला पाहिजे. ही /हा साक्षी म्हणजेच परमेश्र्र होय.
4. विश्वातील प्रत्येक गोष्टीला मूल्य असते. स्थलकालपरत्वे ते बदलते, कमीजास्त होते. म्हणून, शिव-अशिव, चांगले-वाईट या सापेक्ष मूल्यांच्या पलीकडे असणारे म्हणजे सदा शिव (The God) असे काही तरी असले पाहिजे, असे संपूर्णतः सुसंगत व प्रामाणिक विचार करणाराला वाटते. निरपेक्ष चांगले (Absolutely Good) म्हणजे परतेश्वर होय. त्यालाच चिरंतन मूल्य असे म्हणतात. हे सांगण्यासाठीच सत्यं शिवं व सुंदरं या तीन शब्दांची योजना केली गेली आहे.



**परिक्षण :-**

ॲक्वायनस यांनी मांडलेला हा युक्तिवाद सकृद्दर्शनी पटणारा वाटतो. तथापि या युक्तिवादाचे उपरोक्त सर्व प्रकार तर्कदृष्ट [तर्कदोषयुक्त] आहेत. स्वतः स्थिर असलेला पण विश्वातील लहानथोर वस्तूंना, प्राण्यांना गतिमान करणारा व ठेवणारा म्हणजे ईश्वर, ही कल्पना मानवी बुध्दीच्या आकलनशक्तीच्या पलीकडची आहे. कारण, तो ईश्वर प्राणिपदार्थासारखा नाही की ज्याचेबाबत विचार करणे शक्य व्हावे / होते. वस्तू व प्राणी क्षणिक म्हणजे काही काळ टिकणारे असतात. कारण त्यांच्यावर वातावरणाचा परिणाम होत असतो.त्या निसर्गनियमांनी प्रभावित [परिणाम होणा-या] व बध्द होणा-या असतात. याउलट ज्याला निसर्गनियम लागू नाहीत, असा पदार्थ, सदवस्तू (Substance) म्हणजे परमेश्वर (Supernatural Being) ही कल्पना मात्र न समजणारी आहे. अर्थात, मानवी बुध्दीला ज्याप्रकारचे स्पष्टीकरण हवे असते ते सेंट अम्क्वायनस यांनी परमेश्वराच्या अस्तित्वाबाबत दिलेले नाही. विश्वाचे कारण असूनही स्वतः कारणरहित असलेल्या अशा परमेश्वराची कल्पना करणे किंवा त्यासाठी शब्द जोडणे शक्य असले तरी त्या शब्दांचे आकलन करणे कुणालाही व कदापिही शक्य नाही. कदाचित, विश्वातील प्राणिपदार्थ निर्माण होणे हे असेच अविरत चालू राहील, हे तत्व मानता येते. त्यासाठी परमेश्वर मानण्याची गरज नाही. जर वस्तूंच्या निर्मितीमागे विशिष्ट हेतू म्हणजे कारण असेल तर जीवनात दुःख निर्माण करण्याचा हेतू काय, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. याशिवाय अतिशुद्र जीवजंतु कशासाठी निर्माण केलेत, याचेही उत्तर मिळत नाही.

**टीकेला उत्तर :-**

वरील परीक्षणात्मक टीकेचा संशयवादी रोख लक्षात घेऊनही विश्वकारणवादी युक्तिवाद तग धरतो. कारण, विश्वातील घटनांचे स्पष्टीकरण देणे ही मानवी बुध्दीची भूक [गरज] आहे. जर घटनांचा प्रवाह अनंत काळ असाच चालूच राहणार आहे, असे मानले तर मानवी वर्तनाला किंवा एखादया घटनेला चांगले वा वाईट, योग्य वा अयोग्य म्हणताच येणार नाही. उदा. वस्तू वा प्राणी कालांतराने नाहीसे होतातच. मग एखादयाने स्वार्थासाठी काहीचा नाश केला तर बिघडते कुठे या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्यासाठी परमेश्वर व त्याचे विश्वातील नियंत्रण या गोष्टी गृहित धराव्या लागतात, मान्य कराव्या लागतात.

**3.प्रयोजनवादी युक्तिवाद :-**

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी विल्यम पॅले यांनी प्रयोजनवादी युक्तिवाद मांडला आहे. सृष्टीमध्ये प्रयोजकता आढळते. उददेश आढळतो. रचनात्मक व्यवस्था जाणवते, प्राणिपदार्थ टिकून राहण्यासाठीची व मानवी कल्याणाची दृष्टी असल्याचे दिसते. ही रचना / व्यवस्था केवळ यादृच्छिक आहे, असे मानता येत नाही. तिच्यामागे कोणी निर्माता, शासक असला पाहिजे. परमेश्वर हा या चेतन-अचेतन सृष्टीचा किंवा विश्वव्यवस्थेचा निर्माता व रचनाकार [रचयिता] होय.

विल्यम पॅले यांनी आपला युक्तिवाद एका सादृश्यानुमानाच्या आधारे स्पष्ट केला आहे. त्यांनी त्यासाठी घडयाळाचे उदाहरण घेतले आहे. ते म्हणतात. घडयाळाची रचना गुंतागुंतीची असते. त्यातील चक्रे, काटे वगैरेचे एकमेकांशी कार्यात्मक संबंध असतात. त्यामुळे त्यातील काटे पाहून आपण वेळ मोजू / सांगू शकतो. घडयाळातील ते घटक धातूंचे असल्यामुळे ते स्वतः काहीच करत नाहीत तर त्यांना तयार करणारा, कार्याला जुंपणारा कुणीतरी बुध्दिमान प्राणी असला पाहिजे. तो जसा माणूस तसा सृष्टी चालविणारा बुध्दिमान कर्ता म्हणजे परमेश्वर होय.

घडयाळ व विश्व यातील सादृश्शाचा / साम्याचा त्यांनी चिकित्सक विचार केला आहे.

**चिकित्सक विचार :-**



1. घडयाळ मानवनिर्मित आहे. तथापि ज्याला ते मानवनिर्मित आहे असे माहित नाही त्याला देखील ही वस्तू कोणीतरी निर्माण केली असली पाहिजे, असा विचार सुचतो. त्या विचारापासून तो बुध्दी असलेल्या माणसाप्रत येऊन पोचतो. म्हणजे कोणी मानवाने घडयाळ निर्माण केले आहे, असा निष्कर्ष तो काढतो. त्याचप्रमाणे सृष्टीचे निरीक्षण केल्यास सृष्टीचक्र फिरविणारा प्रत्यक्ष दिसत नसला तरी तो असला पाहिजे. असा विचार निर्माण होतो. / येतो. सृष्टीचक्र फिरविणारा तो जो कुणी तो परमेश्वर होय. घडयाळाचे कार्य काही वेळा अचूक चालत नसते तसे सृष्टीतही काही वेळा अनाकलनीय स्थिती निर्माण झाल्याचे दिसते. जर घडयाळ निर्माण करणारा व सृष्टी निर्माण करणारा बुध्दिमान असेल तर तो असे का निर्माण होऊ देतो, असा प्रश्न निर्माण उदभवतो / पडतो. हा प्रश्नात्मक युक्तिवाद सुरुवातीला योग्य वाटत असला तरी सूक्ष्म विचारांती तो खंडित होतो. कारण, घडयाळ जसे दुरुस्त होऊ शकते तसे निसर्गातील प्रघातही [आकस्मिक घटनाही] नंतर नाहीसे [नाहीशा] होतात. या दोन्हीमागे कोणीतरी बुध्दिमान कारागीर असला पाहिजे, असे वाटत राहते.
2. घडयाळातील काही भागांचे आपल्याला महतव वाटत नाही, तसेच काही भाग कशासाठी आहेत ते कळत नाही त्याचप्रमाणे सृष्टीतील अनेक घटकांच्या मागे असलेले प्रयोजन आपल्याला समजत नाही. म्हणून प्रयोजनच नाही, असे म्हणता येत नाही. कारण, अधिकाधिक सुंसंगत विचार केल्यास सृष्टी सुसंगत व सुव्यवस्थित असल्याचेच निदर्शनास येते. निसर्ग म्हणजे अतिशय गुंतागुंतीची एक यंत्रणा आहे. अनेक ग्रह - तारे फिरत आहेत, ऋतु बदलत आहेत, जड व सजीव सृष्टी एकमेकांवर परिणाम करीत आहे, हे आपल्याला आपल्या शरीराच्या ठिकाणीही जाणवते. याचा सूक्ष्म विचार केल्यास त्यामागे विशिष्ट हेतू असावा व तो कुणाचा तरी असावा, असे वाटू व पटू लागते. [हे सूचविण्यासाठीच उदा. समर्थ रामदासांनी मनुष्यासारिखे यंत्र नाही असे विधान केले आहे.] मानवी मेंदू म्हणजे कोटयावधी सूक्ष्म पेशींचे संयुक्त भांडार आहे. मेंदूच्या विशिष्ट भागांना विशिष्ट कामे दिली आहेत, शरीररचनेतही आवश्यकतेनुसार फरक आहेत. उदा. दंडाचे स्नायू यांच्यात फरक आहे. मानवप्राण्यांना बृध्दी आहे तर पशुपक्षी सहजप्रवृत्तीनुसार वागतात. पृथ्वीभोवती ओझोन नावाचा संरक्षक वायू आहे. त्यातून अतिनील किरण गाळून येतात म्हणून पृथ्वी टिकून राहते. जर हे किरण जसेच्या तसे पृथ्वीवर आले तर पृथ्वी जळून भस्म होईल. म्हणून पृथ्वीभोवती ओझोनचा थर निर्माण करणारा कुणीतरी असला पाहिजे. असे अनुतान करण्याकडे बृध्दी होते. हा कुणीतरी म्हणजे परमेश्वर होय.

थोडक्यात, सृष्टीतील व्यवस्थेमागे काही तरी हेतू [प्रयोजन] आहे आणि तो / ते कुणाच्यातरी मनात आहे, असे मानल्याशिवाय सृष्टीचे स्पष्टीकरण देता / करता येत नाही, असा विल्यम पॅले यांचा युक्तिवाद आहे.

**डेव्हिड हयूम यांनी या युक्तिवादावर केलेली टीका :-**

डेव्हिड हयूम यांनी हा प्रयोजनवादी युक्तिवाद तपासला आहे. ते म्हणतात, "विश्व राहण्यासाठी व्यवस्थित असलेच पाहिजे. ज्याचे घटक एकमेकांशी सुव्यवस्थितपणे जोडलेले नाहीत असे विश्व असूच शकत नाही. परमेश्वराने अगोदर पृथ्वीवर प्राणी निर्माण केले पण अतिनील किरणांनी त्यांना नष्ट केले. म्हणून मग / नंतर

परमेश्वराने पृथ्वीभोवती ओझोनचा थर निर्माण केला, हे म्हणणे हास्यापद आहे.'' ते पुढे म्हणतात, '' घडयाळ व निसर्ग यातील सादृश्य अतिशय कनिष्ट प्रकारचे आहे. विश्व अतिमहान व विस्तृत आहे. त्याची तुलना प्राण्यांशी किंवा घडयाळाशी करणे विचित्र वाटते. एवढया मोठया विश्वामागे एखादया कारागिराचा हेतू व हात आहे.हे समजून घेणे कठीण आहे. सृष्टीतील पदार्थ छोटे आहेत. तुलनेने काही मोठे आहेत. या सर्वांना निर्माण करणारा परमेश्वर मात्र एकच आहे. हे म्हणणे देखील अनाकलनीय आहे. सृष्टीत अनेक भू-गोल आहेत. कदाचित त्यांना निर्माण करणारे अनेक देव असतील. म्हणून, परमेश्वर म्हणून कुणी एक आहे, या म्हणण्याला अर्थ उरत नाही.''

**डेव्हिड हयूम यांनी केलेल्या या टिकेला उत्तर :-**

हयूम यांची ही टीका प्रयोजनवादी युक्तिवाद शुध्द करण्यासाठी व सिध्दही करण्यासाठी उपयुक्त आहे. सृष्टीमागे कुणाचाही हात नाही, असे मानणे म्हणजे माणसाच्या जीवनामागे काहीही हेतू नाही, त्याची सारी धडपड बुध्दीयुक्त नाही, असे मानणे होय. परिणामी म्हणजे असे मानले तर, सारे जीवन निरर्थक ठरते. याउलट, परमेश्वर सर्वशक्तिमान आहे, त्याला विविध प्राणी, पदार्थ निर्माण करण्यासाठी काळाचे, वेळेचे बंधन नाही, त्याने चुकत-माकत विश्व निर्माण केलेले नाही. यातच पूर्वनियोजनाची कल्पना अंतर्भूत आहे. विश्वाची रचना अनाकलनीय आहे, हे सत्य आहे. पण, थोडया प्रमाणात का होईना, सृष्टीतील घटनांचा व घटकांचा आपण क्रमवार व सुसंगत अर्थ लावू शकतो व त्याआधारे सृष्टीकर्त्याची कल्पना करु शकतो. त्याचे स्वरुप समजून घेऊ शकतो.

सारांश, प्रयोजनवादी युक्तिवाद अनुमानात्मक आहे. परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा नव्हे.



**4.नैतिक युक्तिवाद :-**

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी केलेल्या उपरोक्त तिन्ही युक्तिवादांचा आशय समजून घेताना ते कसे सदोष वा तर्कदोषयुक्त वा अपुरे आहेत ते आपण पाहिले. परिणामी ईश्वराचे अस्तित्व हा जणू काय एक अंध विश्वासच (Blind Faith) आहे. असे वाटू लागते.

तथापि, विवेकशीलतेवर आधारित अशा या युक्तिवादांना (Rational Demonatration) दूर सारीत कांटने देवाचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी निर्णायक युक्तिवाद (Conclusive Argument) प्रस्तुत केला आहे. मानवी मनाला शक्य असलेला एकमेव निर्णायक युक्तिवाद म्हणजे नैतिक युक्तिवाद होय, असा दावा कांटने केला आहे. म्हणून या युक्तिवादास कांटियन ऑर्ग्युमेंट म्हणूनही ओळखले जाते. नैतिक युक्तिवाद हे शब्दच त्याच्या आशयाचे सूचक आहेत.

**नैतिक युक्तिवादाचा आशय :-**

नैतिक युक्तिवादाचा आशय थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे : ''समाजातील नैतिक मूल्ये हे एक वास्तव असते कारण, नैतिक मूल्ये ही विश्वातच असलेल्या माणसांच्या मनात वास करीत असतात. आपण माणूस म्हणून जसे खरे आहोत तशीच मूल्येही खरी आहेत. हे माणूस नाकारु शकत नाही. माणूस व मूल्ये खरी नसती तर आपल्या मनातील मूल्यांचे स्पष्टीकरण व समर्थन माणूस करु शकलाच नसता. याशिवाय, जर कुणी विचारशील शक्ती [की जिला जगाच्या कल्याणाची काळजी आहे] हे विश्व नियंत्रित करीत नसती तर विश्वात नेतिकता असू तरी शकली असती का'' अर्थातच नसती. म्हणूनच जगात ज्याअर्थी नैतिक मूल्ये आहेत त्याअर्थी [त्यावरुन] ती अबाधित ठेवणारा देवही [कुठल्यातरी रुपात] अस्तित्वात असलाच पाहिजे, असे कांटचे प्रतिपादन आहे. ईश्वर हे विमचे पूर्वगृहितक आहे(Good presupposes God) हे अतिशय अर्थपूर्ण / समर्पक विधान त्याने सदर युक्तिवादाचा निष्कर्ष म्हणून केले आहे.

**नैतिक युक्तिवादाचे महत्व :-**

1. देवाचे अस्तित्व सिदध करण्याचा दावा करणा-या युक्तिवादातील सर्वात समर्थ असा युक्तिवाद म्हणजे नैतिक युक्तिवाद होय. कारण, आपण अगोदर अभ्यासिलेले तिन्ही युक्तिवाद देवाचे अस्तित्व निःसंशयपणे / निःशंकपणे सिध्द कर शकत नाहीत. ते समजून घेताना आपल्या मनात काही ना ािही शंका राहून जातात. शिवाय, काही

विचारवंतांच्या मते, ते सारे युक्तिवाद अनावश्यकही आहेत, नैतिक युक्तिवादाची भक्कम पायावर धर्मविचारुपी इमारत मात्र उभी राहू शकते / उभी आहे.

2. आधुनिक धर्मशास्त्रानुसार देव जर जगातील चांगुलपणाचा समर्थक, आधार नसेल तर तो काही कामाचाच नव्हे. आधुनिक विज्ञानाने तर एवढी प्रगती केली आहे, की त्यामुळे देव आहे, असे मानणेच मोठे कठीण होऊन बसले आहे. तथापि, चांगुलपणाचा आधार म्हणून देव मानण्यास आधुनिक विज्ञानही विरोध करु शकत नाही. कारण, नैतिक युक्तिवादानुसार आपल्याला तथाकथित सर्वज्ञ, सर्वशक्तिमान अशा देवाची निकड [गरज] नसून नैतिक आचरण करणा-या माणसाला दिलासा देणा-या देवाची गरज आहे.
3. सदाचरणी माणसास जे समाधान वाटत असते / हवे असते त्यावरुन नीतीमत्तेचा समर्थक असलेल्या देवावरील विश्वासाचे समर्थन करता येते. नैतिक मूल्यांची परिपूर्णता, सदगुणांची परिपूर्णता किंवा मूर्तिमंत सदगुण म्हणून देवाची कल्पना आपल्यासमोर येते. मानवी जीवनातील न्याय, सत्य, प्रेम, शहाणपण, चांगलपण इत्यादी मूल्ये मानवी मनातील देवात्वाकडे बोट करतात. अर्थात, या मूल्यांच्या रपाने देव माणसाच्या अंतःकरणात राहत असतो. प्रेमाची मूर्ती, न्यायमूर्ती म्हणून आपण देवाकडे पाहू शकतो. या अर्थाने देव व चांगुलपण यातील घनिष्ट संबंधाकडे आपण अर्थपुर्ण दष्टीने पाहू शकतो. अशा देवावर आपण प्रेम करु शकतो, अशा देवाची आपण सेवा करु शकतो, अशा देवास आपण प्रार्थना करु शकतो.

**ब) न्याय दर्शनातील ईश्वराची संकल्पना**

मेधातिथी गौतम (इस.पू.550) ऋषि हे न्याय दर्शनाचे प्रणेत होते. 'न्यायसूत्रे ' हा न्यायदर्शनाचा मूळ ग्रंथ आहे.न्याय शब्दाचा अर्थ 'उभय पक्षांना मान्य असणारा निर्णय.' नीयते अनेन इति न्यायः ' अशी न्यायाची व्याख्या आहे. त्याचा अर्थ '' जो आपल्याला निष्कर्षाकडे नेतो तो न्याय ''. हा न्याय कसा मिळवावा किंवा कसा मिळतो, याचेच मार्गदर्शन त्यांच्या वादपध्दतीत मिळते, हे आपण पाहिलचे आहे. न्याय दर्शन न्यायप्रक्रियेची तार्किक रचना सांगते.म्हणूनच न्याय दर्शनास भारतीयांचे तर्कशास्त्र मानले जाते.

न्यायदर्शनाने ईश्वर मानला आहे. त्यांच्या मत, जीवात्मे अनंत असून ईश्वर मात्र एक आहे, तो दुःखरहित, सर्वज्ञ आणि सृष्टीचा कर्ता, नियंता आहे.तो परम कनवाळु, अनुग्रह करणारा आहे.जीवात्म्याप्रमाणे ईश्वरही एक आत्माच आहे,पण विश्वात्मा आहे.तो व्यक्तिरुप आहे तथापि सुखदुःखांपासून अलिप्त आहे.त्याने हे जग निर्माण करण्यासाठी परमाणुंचा उपयोग केला. ईश्वर जगाचे निमित्तकारण आहे.

ईश्वराचे ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणाने होउ शकत नाही, त्याचे अस्तित्व न्यायदर्शनकार अनुमानांने सिध्द करता येते, असे वात्सायन या न्याय तत्वज्ञाच्या मत आहे. ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची गरज नाही.तर गंगेशोपाध्याय याने ''तत्त्वचिंतामणि'' या ग्रंथात ''ईश्वरानुमान'' असे प्रकरण लिहिले. त्याच्या मते टेबल, खुर्ची, मडके इत्यादी वस्तु आपणास अनुभवास येतात.ही कार्ये आहेत.त्या कार्याना कर्ता असणारच.म्हणजे त्या वस्तु ज्याअर्थी अस्तित्वात आहेत त्याअर्थी त्या तयार करणारा सुध्दा कुणीतरी असणारच. त्याप्रमाणे नद्या, पर्वत, समुद्र, पाने,फुले ही अशीच कार्ये आहेत.त्यांनाही निर्माण करणारा कुणीतरी असणारच.त्यशिवाय ते निर्माण झालेच नसते.

तोच ईश्वर !

वेद आणि धर्मशास्त्रे ही ऋषिनी म्हणजे माणसांनी लिहिले आहेत, असे *न्यायभाष्य* व *न्यायवार्त्तिक* या ग्रंथात म्हंटले आहे. तसेच *न्यायसूत्रांत* व या दोन्ही ग्रंथांत "वेदग्रंथ ईश्वराने केले आहेत", असे विधान सापडत नाही. *न्यायवार्त्तिक* हे सातव्या शतकातले आहे. वैशेषिकसूत्र व प्रशस्तपादाचे *भाष्य* यांचेही असेच मत आहे. त्यानंतरच्या न्याय-वैशेषिक दर्शनांवरील ग्रंथांत वेद हे ईश्वरप्रणीत आहेत, असा सिद्धांत मांडलेला आहे. *न्यायसूत्रभाष्य* व *वार्तिक* यांमध्ये ईश्वराचे अस्तित्व सिद्ध केले आहे; परंतु त्या संदर्भातही ईश्वर वेदकर्ता आहे, असे कोठेही म्हटलेले नाही. मात्र, उदयनाचार्य (दहावे शतक) यांनी *न्यायकुसुमांजलि* हा ग्रंथ ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्याकरिता लिहिला असून त्यात ईश्वर वेदकर्ता म्हणून सिद्ध केलेला आहे. वैशेषिक दर्शनाच्या कणादप्रणीत *सूत्रां*मध्ये ईश्वरचा निर्देशही नाही. सहाव्या

शतकातील प्रशस्तपादप्रणीत (भाष्य) या वैशेषिक दर्शनाच्या ग्रंथात ईश्वराचे अस्तित्व भाष्य केलेले असले तरी, आम्नाय म्हणजे वेद व स्मृती ऋषिंनी निर्माण केले आहेत, असे *न्यायभाष्या*प्रमाणेच म्हटलेले आहे. वैशेषिक दर्शनातही प्रशस्तपादाच्या नंतर झालेल्या ग्रंथांमध्ये ईश्वर हा वेदांचा कर्ता म्हणून सिद्ध केला आहे.[2]



[2] जोशी, लक्ष्मणशास्त्री, *न्याय दर्शन,* http://www.marathivishwakosh.in/khandas/khand8/index.php